नि.दि.दावा क्र.२५७/२०२२
अशोक व इतर वि. विश्वनाथ

## निशाणी क्र. १० खालील आदेश
## CNR No.MHNS130012392022

प्रस्तुत अर्ज वादीने तालुका उप अधिक्षक, भुमी अभिलेख, निफाड यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक होणेकामी केलेला आहे.

२. वादीचे थोडक्यात म्हणणे असे की, मो.र.नं.५५६५/२०१८ अन्वये झालेल्या दावा मिळकत गट नं. २६४२ चे मोजणी नकाशाची प्रत त्यात प्रतिवादी नं. १ यांनी वादीचे गट नं. १ यांनी वादीचे गट नं. २६४२ मध्ये ००हे ६९ आरचे अतिक्रमण केल्याचे दर्शविले आहे. अतिक्रमण झालेल्या संदर्भात दोन्ही गटांची मोजणी होणे गरजेचे आहे. त्याकामी दावा मिळकतीची शासकीय मोजणी नकाशासाह अहवाल न्यायालयासमोर येण्यासाठी तालुका उपअधीक्षक, भुमी अभिलेख निफाड यांची कोर्ट कमिशनर म्हणुन नेमणुक होण्यासाठी केला आहे.

३. वादीचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, गट क्र. २६४२/१ मध्ये वादी क्र. १ ते ५ हे मालक कब्जेदार आहेत. गट क्र. २६४२/२/अ/२/१६ मधील वादी क्र. ६ ते ८ हे मालक कब्जेदार आहेत. गट क्र. २६४२/३ मध्ये वादी क्र. १३ ते १८ आणि वादी क्र. १९ ते २२हे मालक कब्जेदार आहेत. तर गट क्र. २६४० मध्ये प्रतिवादी यांची मालकी कब्जा आहे. वादी क्र. १ ते २२ आणि प्रतिवादी हे एकमेकांचे वर नमुद मिळकतीत लगतचे कब्जेदार आहेत. वादींनी मो. र. क्र. ५५६५/२०१८ नुसार गट क्र. २६४२ ची शासकीय मोजणी करुन घेतली. त्यामध्ये प्रतिवादींनी ६९

आर क्षेत्रावर अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाले. त्याआधारे वादींनी प्रस्तुतचा दावा दाखल केला.

४. वादींनी पुढे कथन केले की, दावा मिळकतींमध्ये हद्दीचा वाद असुन प्रतिवादींनी अतिक्रमण केले आहे. त्याकरीता उपअधिक्षक भुमि अभिलेख, निफाड यांची न्यायालीयन आयुक्त म्हणुन नेमणुक होवुन दावा मिळकतीची संयुक्त मोजणी होणे आवश्यक आहे. सबब, अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

५. प्रस्तुत दाव्याचे समन्स प्रतिवादीस मिळुनही ते दाव्याकामी हजर झाले नाही. सबब,त्यांच्या विरुध्द एकतर्फा आदेश पारीत केला आहे.

६. अतिक्रमण दुर करण्याच्या दाव्यात उभयतांना मान्य नकाशा किंवा आयोगाचा अहवाल व नकाशा अटळ आहे. वादीने त्यांच्या व प्रतिवादी यांच्या मिळकतीची मोजणी होऊन नकाशा व अहवाल मिळण्याची आणि हद्दीखुणा निश्चीत करण्याची मागणी केली आहे. वादीचा आणि प्रतिवादींचा वाद मिळकतीबाबत वाद आहे असे दिसते. पुर्वी देखील मोजणी मो.र.क्र.५५६५/२०१८ नुसार करण्यात आली होती. सबब, दाव्याचे स्वरुप लक्षात घेता दावा मिळकतींची संयुक्त मोजणी होणे आवश्यक आहे. म्हणुन तज्ञांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणुक करुन मोजणी करुन नकाशा व अहवाल प्राप्त केल्याशिवाय वाद संपणार नाही असे दिसते.

७. म्हणून उप–अधिक्षक, भुमी अभिलेख, निफाड यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणुक करण्यासाठी वादी आणि प्रतिवादी यांनी त्यांच्या मिळकतीच्या मोजणीचा आयुक्ताचा खर्च देण्याच्या अटीवर वादाचे पुर्ण निराकरण करण्यासाठी अहवाल व नकाशा दाखल करण्यासाठी करणे न्यायाचे होईल. म्हणुन खालील आदेश पारीत करण्यात येतो.

# <u>आदेश</u>

१. वादीचा अर्ज **<u>निशाणी क्र.१०</u>** मंजूर करण्यात येतो.

२. **<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम २६ नियम ९ सह वाचणीय कलम ७५ (ब)</u>** नुसार उप–अधिक्षक, भुमी अभिलेख, निफाड यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून मौजे ओझर टाउनशीप, ता. निफाड, येथील गट क्र. २६४२/१, गट क्र. २६४२/२/अ/२/१६, गट क्र. २६४२/३, गट क्र. २६४० या वादी व प्रतिवादींच्या मालकीच्या जमीनींची मोजणी करुन, अतिक्रमण असल्यास ते दर्शवुन, झाडे यांचा स्पष्ट उल्लेख करुन, हद्दी–खुणा दाखवुन त्या निश्चीत करुन आयुक्तास पत्र मिळाल्यापासुन २ महिन्याच्या आत नकाशा काढून नकाशा व अहवाल दाखल करण्यासाठी नेमणुक करण्यात येते.

३. वादी क्र. १ ते २२ आणि प्रतिवादी यांनी उप–अधिक्षक, भुमी अभिलेख, निफाड यांच्या कार्यालयात त्यांच्या सुचनेनुसार आवश्यक शुल्क नियमाप्रमाणे अदा करावे व आयुक्त पत्र विनाविलंब जारी करण्यासाठी शुल्क पावतीची सत्य प्रत अभिलेखावर दाखल करावी.

४. वादी क्र.१ ते २२ आणि प्रतिवादी यांनी ते ज्या मालकी हक्क दस्तऐवज व महसुल आणि इतर कागदपत्रावर भरवसा ठेवतात अशा कागदपत्रांच्या २ प्रमाणित/सत्यप्रती व १ छायांकीत प्रत दाखल करण्याचा निर्देश देण्यात येतो.

५. आयुक्ताला दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८ चे कलम ७५ ते ७८ क्रम २६ व अंतर्गत नियम तसेच दिवाणी प्रक्रिया नियमावलीतील प्रकरण क्र.८ परिच्छेद १५१ ते १७० व महसुल नियमातील आवश्यक नियमांचा अवलंब करुन आयुक्ताचे कार्य सत्वर पुर्ण करण्याचे व मोजणी

नकाशा व अहवाल दाखल करण्याचे निर्देशित करण्यात येते. आयुक्ताचे काम काही अपरिहार्य कारणामुळे ठरवुन दिलेल्या मुदतीत पुर्ण होऊ शकले नाही तर न्यायालयीन आयुक्त उपरोक्त मुदत संपण्यापुर्वी न्यायालयाकडे लेखी अर्ज करुन मुदत वाढ मागु शकतात.

६. उभय पक्षांना जातीने अथवा विधिज्ञांमार्फत न्यायालयीन आयुक्ताने नेमलेल्या तारखेला व वेळी हजर राहण्याचे निर्देशित करण्यात येते.

७. न्यायालयीन आयुक्ताला उभय पक्षांना आयोगाचा ठरलेला दिवस, तारीख व वेळेची सुचना वादपत्राच्या सरनाम्यातील पत्त्यांवर नोटीसा काढून कळविण्याबाबत निर्देशित करण्यात येते. वादीला वादपत्र व कैफीयतीच्या प्रमाणित प्रती न्यायालयीन आयुक्ताला आयोगाचे स्वरुप व हेतूचे आकलन होण्यासाठी देण्याचे निर्देशत करण्यात येते.

८. जर आयोगाच्या ठरलेल्या दिवशी, तारखेला व वेळी कोणताही पक्ष गैरहजर राहिल्यास न्यायालयीन आयुक्तांनी तसा पंचनामा करुन आयोगाचे कार्य उपस्थित पक्षकारांसमक्ष पुर्ण करावे.

९. वादी आणि प्रतिवादी यांनी आदेश कलम ३, ४ आणि ७ ची पुर्तता तात्काळ करावी.

१०. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात येतो.

KOLEKAR PRASAD DIPAK

Digitally signed by KOLEKAR PRASAD DIPAK
Date: 2024.09.06 16:59:33 +0530

**( पी.डी. कोळेकर )**

**दिनांकः– ०५/०९/२०२४**

**दिवाणी न्यायाधिश क.स्तर.,**

**पिंपळगांव (बसवंत )**